**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,**
प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
छत्रपती संभाजी नगर ४३१००५
**(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)**
**Telephone : 0240-2334025** **Email.rbteau@msbte.com** **Web : www.msbte.ac.in**

जाक्रं.मरातंशिमं/प्रा.का./छ.सं./का-५५/२०२५/ 1031 दिनांक : २६/०८/२०२५.

**प्रति,**
**प्राचार्य,**
**या कार्यालयाशी संलग्नीत सर्व संस्था तसेच स्वायत्त व अनुदानित संस्था.**

**विषयः "मराठी भाषा दुत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेबाबत.**

संदर्भः १. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.८८(१९३/२५)/समन्वय, दि.१८/०८/२०२५.
२. मा.सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.मरातंशिमं/का-५५/मराठी भाषा दूत/वक्तृत्व स्पर्धा/२०२५-२६/५२८४, दि.२५/०८/२०२५.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.अमभा-२०२५/प्र.क्र.१०२/भाषा-१, दि.१४/०८/२०२५ च्या पत्रानुसार दि.०८/०९/२०२५ ते २२/०९/२०२५ या कालावधीत **"मराठी भाषा दुत"** ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेच्या आयोजन करण्यात आले असुन त्याकरीता **"अभिजात मराठी-माझ्या अपेक्षा"** हा विषय देण्यात आला आहे. सदर ऑनलाईन स्पर्धेकरीता सहभाग नोंदविण्याचे आवाहन मराठी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे.

तरी या कार्यालयांतर्गत असलेल्या संलग्नित तसेच स्वायत्त व अनुदानित संस्थाप्रमुखांनी संदर्भीय पत्रात नमुद सदरील माहीती प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना अवगत करुन स्पर्धेत सहभाग घेण्यास प्रोत्साहीत करावे व त्याचा अहवाल या कार्यालयास दि.२३/०९/२०२५ पर्यंत सोबत दिलेल्या Google Form Link वर सादर करावा.

**सोबत : Google Form Link**

D. Dandalwal 26.8.25
**( देवेंद्र र.दंडमल्हाळ )**
**उपसचिव,**
**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,**
**प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

प्रतः मा. सचिव, म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

३५५

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांकः- संकीर्ण -२०२५/प्र.क्र. ८८ (१९३/२५) /समन्वय

दिनांकः- १८ ऑगस्ट, २०२५.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक, (ग्रंथालय), ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय- "मराठी भाषा दूत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक अमभा-२०२५/ प्र.क्र. १०२/ भाषा-१, दिनांक १४/८/२०२५ चे पत्र व सहपत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. दिनांक ८ सप्टेंबर, २०२५ ते २२ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत "मराठी भाषा दूत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, त्याकरीता "अभिजात मराठी-माझ्या अपेक्षा" हा विषय देण्यात आला आहे. सदर ऑनलाईन स्पर्धेकरीता सहभाग नोदविण्याचे आवाहन मराठी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे. त्यानुसार, सदर कार्यक्रमाची आपल्या विभागाच्या पोर्टल तसेच Whatsapp Group वर देण्याची विनंती सदरहू पत्रान्वये करण्यात आली आहे.

३. तरी, सोबतच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांनुसार आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

का.१८

गौरी म्हस्के

(गौरी म्हस्के)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवडनस्ती (समन्वय कक्ष).

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग
नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२- २२७९ ४१ ६८
Email ID - shilpa.deshmukh@nic

---

क्रमांक : अमभा -२०२५/प्र.क्र.१०२ /भाषा-१

दिनांक:-१४.८.२०२५

प्रति,
कक्ष अधिकारी (आस्थापना)
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- "मराठी भाषा दूत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजनाबाबत

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने "मराठी भाषा दूत" ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेच्या कार्यक्रमाबाबतची माहिती प्रसिध्दीसाठी सोबत जोडत असून, सदर माहितीला सचिव (मराठी भाषा) यांची मान्यता घेण्यात आली आहे. तरी सदर कार्यक्रमाची बातमी आपल्या विभागाच्या पोर्टल तसेच, Whatsup Group वर देण्यात यावी, ही विनंती.

आपली,
(स्वाक्षरी)
(मनिषा शिंदे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रतः- संग्रहार्थ (कार्यासन भाषा-१)

"अभिजात मराठी - माझ्या अपेक्षा " या विषयावार वक्तृत्व स्पर्धा.

मराठी भाषा दूत वक्तृत्व स्पर्धा , महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित करण्यात आली आहे .

केंद्र शासनाच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ च्या अधिसूचनेन्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्या अनुषंगाने राज्य शासनाने शासन निर्णय निर्गमित करुन दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस तर ३ ते ९ ऑक्टोबर हा सप्ताह अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताह मध्ये मराठी भाषा विभागातर्फे -मराठी भाषा दूत - ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा जगभरातील १८ ते २१ वयोगटातील मराठी बोलणाऱ्यांसाठी खुली असेल. "अभिजात मराठी-माझ्या अपेक्षा" या विषयावर जास्तीत जास्त तीन मिनिटांचा वेळ प्रत्येक स्पर्धकाला देण्यात येईल. स्पर्धेचे संयोजन ऑगस्ट मीडिया या संस्थेतर्फे केले जाईल. वक्तृत्व स्पर्धा दिनांक ८ सप्टेंबर २०२५ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. महाराष्ट्रातील वेगवेगळे महसूल विभाग तसेच बृहन्महाराष्ट्र मिळून प्रथम नोंदणी करणाऱ्या १००० स्पर्धकांना प्रवेश मिळेल.

स्पर्धकांनी विषयाचे आकलन करून तो विषय आपल्या पद्धतीने मांडणे अपेक्षित आहे. यामधून जास्तीत जास्त १०० उत्तम स्पर्धकांची निवड -मराठी भाषा दूत - म्हणून करण्यात येईल. तसेच, सर्व सहभागींना महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. गुगल फॉर्म पाठवण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ , रात्री १२ पर्यंत आहे.

या वयोगटातील जास्तीत जास्त युवकांनी या ऑनलाईन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन मराठी भाषाविभागातर्फे करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी https://forms.gle/NYvWxvYCSFXCjkzn9 या लिंक किंवा क्यू आर कोड वापरुन ऑनलाईन नोंदणी करावी.

-----------------